I J R S S I S, Vol. VIII, Issue (3), May-2022 : 197-199
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# भारतातील स्थानीक स्वराज्य संस्थाची दशा आणि दिशा

कु. रचना ध. वानखडे व डॉ. प्रमोद एस. शंभरकर

सरदार पटेल महाविद्यालय, चंद्रपूर.

Corresponding Author : rachanawankhade87@gmail.com

Communicated : 29.03.2022 Revision : 02.04.2022 Accepted : 08.04.2022 Published : 02.05.2022

**सारांश :**

लोकसहभागातून गावांचा व शहरांचा जास्तीत–जास्त विकास व्हावा यासाठी आपल्या देशाने व राज्याने पंचायत राज व्यवस्थेचा स्वीकार केलेला आहे. त्यां व्यवस्थेतून ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद या संस्थाची अनुक्रमे गाव, तालुका व जिल्हा पातळीवर स्थापना करण्यात आलेली आहे.

भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थाचा 'राज्यसुचित' समावेश करण्यात आलेला आहे. यावरून स्थानिक स्वराज्य संस्थानसंदर्भात महत्वाची भुमिका राज्यशासन घेतांना दिसते. पंचायत राज्य व्यवस्थेचा अभ्यास करण्यासाठी बलवंत राय मेहता समिती, १९५७ चे महत्व ७३ व ७४ घटना दुरूस्तीचे महत्व अन्यसाधारण आहे. स्थानिक स्वराज संस्थांचे दोन प्रकार पडतात जसे की ग्रामीण विकासासाठी जिल्हापरिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत तर शहरी विकासासाठी महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत यांचा समावेश होत असतो. भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थांनची दशा आणि दिशा यातून ग्रामीण विकासाचा अभ्यास करण्यात येणार असून जिल्हा परिषद पंचायत समिती आणि ग्रामपंचायत यांच्या कार्याचा ग्रामिण विकासात कितपत उपयोग करण्यात आलेला हे बघण्याचा मानस आहे.

ग्रामिण विकास हाच भारतीय राजकिय व्यवस्थेचा खरा कणा आहे. आणि ग्रामिण विकासातूनच भारताची खरी प्रगती होतांना दिसुन येते हेच गांधीचीचे हि स्वप्न होते. जे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून पूर्ण होताना दिसत आहे. अश्या ग्रामीण स्वराज्य संख्येच्या विकास व अडचणी या शोध निबंधातून प्रस्तुत करने हा उदेश.

**बीजशब्द :** स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषद, पंचायत समिती, विकास, पंचायतराज, ग्रामपंचायत.

**प्रस्तावना :**

स्थानिक स्वराज्य संस्था या शासनसंस्थेचाच एक प्रकार किंवा भाग होय. मर्यादीत कार्यक्षेत्र हे त्याचे एक प्रमुख लक्षण समजले जाते. तथापी स्थानिक स्वराज्य संस्थांचे कार्यक्षेत्र मर्यादित स्वरूपाचे असले तरी त्याची उपयुक्तात मात्र खुप मोठी आहे. विशेषत: लोकशाही व्यवस्थेत तर त्यांचे महत्व वादातित आहे. लोकशाही व्यवस्थेला मजबूती प्रदान करणारे जे काहि घटक आहेत. त्यांपैकी स्थानिक स्वराज्य संस्था हा महत्त्वपूर्ण घटक होय. स्वातंत्र्या नंतर भारतात समुदाय विकास कार्यक्रम व राष्ट्रीय विस्तार सेवा या कार्यक्रमाच्या माध्यमातून विकास साधण्याचा प्रयत्न करण्यात आला पण त्यात अपयश आले. म्हणून या योजनांचा पुनर्विचार करण्यासाठी तसेच केंद्रीय पातळी वर १९५७ ला बलवंत राय मेहता समिती नियुक्त करण्यात आली. त्या समितीने त्रिस्तरिय पंचायतराज व्यवस्थेची शिफारस केली. स्थानिक स्वराज संस्था हा विषय राज्यसुचीमध्ये आहे. बलवत राय मेहता समितीच्या शिफारशी नुसार महाराष्ट्रातील पंचायतराज मधील सुधारणा सुचवण्यासाठी वंसत राव नाईक समिती नेमण्यात आली या समितीच्या शिफारशींच्या आधारावर मुंबई अधिनियम, १९५८ महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ नुसार महाराष्ट्रात १ मे १९६२ रोजी पंचायत राज अस्तीत्वात आले. ०२ ऑक्टो १९५९ रोजी राजस्थान व १ नोव्हें १९५९ रोजी आंध्रप्रदेशात आधी पंचायत राजची सुरूवात करण्यात आली होती.

या काळात पंचायतराजची स्थापना होऊनही स्वराज्य संकल्पना उदयास आली नाही. ल. ना. बोनगीरवार समिती १९७०, पी. बी. पाटील १९८४, या सारख्या अनेक समितीच्या मूल्यमापनातून सुधारणा व विकासाठी अनेक प्रयत्न करण्यात आले पण त्यातून स्थानिक स्वराज्य संस्थांचा विकास साध्य होवू शकला नाही. पंचायतराज व्यवस्थेचा स्विकार भारतातील सर्व घटक राज्यांनी केला असला तरीही त्यांच्या मध्ये एकसुत्रता नव्हती. हि एकसुत्रता आणुन या व्यवस्थेस घटनात्मक दर्जा देण्याचे कार्य ७३ व्या घटना दुरूस्ती मार्फत करण्यात आले. दिवगंत पंतप्रधान पि. व्ही. नरसिंहराव यांच्या कार्यकाळात २४ एप्रिल १९९३ पासून हा कायदा लागू करण्यात आला. या कायदयामुळे समाजातील दुर्बल, दुर्लक्षीत घटकाबरोबरचं महिलांनाही राजकीय सहभागाची हमी प्राप्त झाली. त्यामुळे भारतीय इतिहासात या घटना दुरूस्तीला अनन्य साधारण महत्व आहे.

**७३ व्या घटना दुरूस्तीचे योगदान व मर्यादा :—**

१९८९ साली राजीव गांधीच्या पुढाकारातून ६४ व्या घटनादुरूस्ती विधेयकाच्या निमित्ताने स्थानिक स्वशासन सक्षमीकरणाचा विचार लोकसभेत मांडण्यात आला. पुढे अनेक अडथळयांच्या शर्यती पार करत १९९२ साली पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांनी संसदेत हे विधेयक मांडले व २२ डिंसे १९९२ रोजी राज्यसभा व लोकसभेत ती मंजूर झाली. या विधेयकाव्दारे भारतीय संविधानातील नवव्या भागात कलम २४३ अंतर्भूत करण्यात आले व संविधानात अकरावे आणि बारावे परिशिष्ट अंतर्भुत करून त्यात राज्य सरकारकडून पंचायत राज व नागरी स्वशासन संस्थासाठी २९ व १८ विषयांचा समावेश करण्यात येवून त्यांच्यात कामाची वाटणी करण्यात आली. या घटनादुरूस्तीतील प्रमुख तरतुदी पुढील प्रमाणे.

१. पंचायतराज संस्थाच्या निवडणुका दर पाच वर्षांनी घेणे, पंचायतराज संस्थांच्या तिन्ही संस्थामध्ये अनुसूचित जाती व जमातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण तसेच महिलान करीता (१/३ जागा राखीव).

२. दर पाच वर्षांनी वित्त आयोणाची स्थापना करून नागरी व ग्रामीण स्थानिक स्वराज संस्थांच्या कामकजाचा आढावा घेणे.

३. पंचायतराज संस्थाचा कार्यकाल पाच वर्षाचा करणे, जिल्हापरिषद अध्यक्ष, पंचायत समिती सभापती व ग्रामपंचायतीच्या सरपंच पदासाठी आरक्षण, घटनेच्या २१ व्या अनुसूचीतील २९ विषय पंचायतराज संस्थाकडे हस्तांतर करणे.

४. केंद्र व राज्य शासनाकडील योजना जिल्हा परिषदे हस्तांतरीत करणे.

५. राज्य निवडणूक आयोगाची स्थापना करणे यासरख्या मार्गदर्शक तत्वांना व पंचायतराज व्यवस्थेला ७३ व्या घटनादुरूस्तीने घटनात्मक दर्जा दिला.

या घटनादुरूस्तीची तंतोतंत आणि सकारात्मक दृष्टीकोनातुन अंमलबजावणी झाली तर या संविधान संशोधनाचा उद्देश सफल झाला असता. मुळात स्थानीक प्रशासनाचा विकास आणि सक्षमीकरणात राजकीय इच्छाशक्तीचा अभाव आणि प्रशासकिय अहंवाद हे दोनच मुख्य व महत्वाचे प्रश्न आहेत.

**मर्यादा :—**

१. पंचायतराज विकेंद्रीकरणाचा अधिकार राज्यसरकारकडे आहे. तसेच राज्यसरकार कडून मिळणारा अपुरानिधी.

२. नोकरशाहीचे वाढते वर्चस्व, विषयसूची बाबतीत अस्पष्टता.

३. पंचायतराज संस्थांना स्वत:ची उत्पन्नाची साधने नाहीत. वाढत्या नागरिकरणास तोंड देण्यास अपुरानिधी.

४. कमकुवत स्वराज्याचा राज्य वित्त आयोग, राजकीय पक्षांचे वाढते प्राबल्य.

५. घराणेशाहीचे सतत वाढते वर्चस्व व ग्रामसभा शक्तिशाली परंतु कमकुवत स्वरूप.

**ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थाच्या अडचणी :—**

ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकासामध्ये अनेकविध अडचणी येत असून त्या अडचणीचा थोडक्यात आढावा पुढील प्रमाणे.

१. पंचायतराज्यला ग्रामीण पुर्णरचणेचे एक महत्वाचे साधण समजले जाते. ती साध्य करण्यासाठी जनतेने पंचायत राज संस्थांच्या कार्यात सहभागी होणे आवश्यक असते पण जनता सहभागी होत नसेल तर ती खुप मोठी समस्या आहे.

२. जबाबदारीच्या जाणीवेचा नागरीकांत अभाव असतो तसेच दारिद्र ही महत्वाची समस्या असते.

३. लोकांच्या वाढत्या अपेक्षा असतात परंतु मर्यादित उत्पन्न — साधने, मर्यादित कर उत्पन्न यामुळे लोकांच्या ग्रामीण विकासातील अडचणी सोडविल्या जात नाही.

४. पदाधिकारी व कर्मचारी तसेच ग्रामीण जनता यांच्यात प्रत्येक गोष्टीत एकमत जुळून येत नाही ही समस्या मोठी आहे.

५. पक्षीय राजकारणाचा विळखा, गटबाजी व सत्ता स्पर्धा तसेच राजकारणाचे गुन्हेगारी करण यामुळे ग्रामीण विकासाची दशा झालेली दिसून येते.

**शिफारशी:—**

स्थानीक स्वराज्य संस्थांच्या विकासात अनेक अडचणी जाणवतात त्या अडचणी सोडविल्यास स्थानीक स्वराज्य संस्थेचा विकास होईल व त्यांची दयनीयता संपेल अशी संशोधीकेला विश्वास वाटतो. याकरीता खालीलप्रमाणे उपाययोजना सुचविल्या आहेत.

१. ग्रामीण भागात स्त्री—पुरूष साक्षरतेची टक्केवारी वाढवून सगळया लोकांचा विकासकार्यात सहभाग नोंदविणे आवश्यक आहे.

२. जनसामान्याचा सत्तेत सहभाग वाढवुन स्त्री असेल किंवा पुरूष सगळयांना एका प्रवाहात आणायला हवे जेनेकरून स्थानीक स्वराज्य संस्थेत समानता आढळुन येईल व पुरूषाबरोबर स्त्रि सुध्दा भक्कमपणे तिचे कार्य करू शकेल.

३. स्थानिक प्रश्नांची यशस्वीरित्या सोडवणूक केली तर तेथिल विकास साधता येईल यासाठी स्थानिक नेतृत्व गुणाला वाव देण्यात यावा त्यामुळे तेथिल जनता,

सक्रियतेने राजकारणात सहभागी होऊन विकास साधु शकतील.

४. शेती सुधारणा, जलसिंचन, सहकार, समाज कल्याण, पशु संवर्धन, दुग्धविकास या सगळयासाठी केंद्र व राज्य सरकार वेगवेगळया योजना आखतात त्या योजनांची माहिती त्यांना ज्या पद्धतीने देता येईल त्या पद्धतीने दयावी.

५. जिल्हापरिषद व पंचायत समिती यांच्या पदाधिकाऱ्यांनी ग्रामसभेच्या बैठकिंना उपस्थित राहावे व गावातील लोकांच्या सोईची वेळ पाहून ग्रामसभेचे आयोजन करावे.

६. घराणेशाहीस आढा घालून निपक्ष निवडणूका घेणे आवश्यक तसेच पक्षीय राजकारण व गटबाची तसेच गुन्हेगारीला वेगवेगळया माध्यमातून आळा घालायला हवा.

**संदर्भ :**

भारतातील स्थानिक स्वशासनसंस्था–प्रा. बिराजदारा घोडके – अंशुल पब्लीकेशन, नागपूर १९९९

पंचायतराज व नागरी स्वराज्य संस्था – विनायक चांदगुडे – सकाळ पेपर पब्लीकेशन, पुणे मे २०१७

भारतातील स्थानिक स्वशासन– राज लोटे – पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लीकेशन, ऑक्टो २०१२

महाराष्ट्रातील पंचायतराज व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था –प्रा. व्ही. बी. पाटील – के सागर पब्लीकेशन २०१८

पंचायतराज संख्या आणि विकासाच्या योजना–प्रा. संजय खंडारे आणि प्रा. शैला थोरवे–अनुज पब्लीकेशन औरंगाबाद २०१८